# वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट

## अंक २२ वा

## दिनांक २६/०५/२०२० ते दिनांक २९/०५/२०२०

## पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.

जावक क्रमांक :- 2807 दिनांक :- 18 JUN 2020

---

**भाग- १ :-**

**बदली :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक: पोअवा/अधि.आस्थापना/पो.नि.अनिल ठाकरे/कसुरी बदली/२०२०/२६४५ वाशिम दिनांक :- २८/०५/२०२० अन्वये श्री अनिल बापुराव ठाकरे, पोलीस निरीक्षक, पो.स्टे. रिसोड यांची कसुरीवरुन पोलीस नियंत्रण कक्ष वाशिम येथे प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात येत आहे. त्यांनी तात्काळ पोलीस नियंत्रण कक्ष वाशिम येथे हजर व्हावे. तसेच सहायक पोलीस निरीक्षक महेद्रंकुमार प्रकाश गवई हे पुढील आदेशापावेतो पोलीस स्टेशन रिसोड येथील तात्पुरता अतिरीक्त कार्यभार सांभाळतील.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक: पोअवा/विचौशाखा/सपोउपनि-६४२, रवि/कसुरी/बदली/२६४८/२०२० वाशिम दिनांक :- २८/०५/२०२० अन्वये सपोउपनि/६४२, रवि सैबेवार, नेमणुक पोस्टे शिरपुर ( सध्या उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय, वाशिम) येथे नेमणुकीस असतांना यांचेविरुदध्द प्राप्त झालेल्या कसुरी अहवालावरुन त्यांची उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय वाशिम येथुन पोस्टे मानोरा येथे त्वरीत प्रभावाने बदली करण्यांत येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशाखा/पोहवा-६४८, संजय घुले/ कसुरी/बदली/२६४७/२०२० वाशिम दिनांक २८/०५/२०२० अन्वये पोहवा/६४८, संजय घुले, नेमणुक पो.स्टे. जऊळका येथे नेमणुकीस असतांना यांचेविरुध्द प्राप्त झालेल्या कसुरी अहवालावरुन त्यांची पोस्टे जऊळका येथुन पोस्टे धनज येथे त्वरीत प्रभावाने बदली करण्यांत येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आस्था/आ.जि.- बदली/कार्यमुक्त-खरात/२६८३/२०२०, वाशिम दिनांक :- २९/०५/२०२० अन्वये आंतर जिल्हा बदलीवर कार्यमुक्त करणे बाबात मुंबई पोलीस नियमावली भाग-१ मधील नियम क्रमांक १६७(३) (एन)च्या तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोली-५ब, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ मधील बदली नियमावली नुसार आंतर जिल्हा बदलीवर पोलीस अधिक्षक, जालना यांनी खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंतीनुसार आंतर जिल्हा बदलीवर " पोलीस शिपाई " पदावर त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गा मध्ये स्वीकारण्यास स्वीकृती दिली आहे. खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना आंतर जिल्हा बदलीवर स्विकृती दिल्याने त्यांना त्यांचे विनंती नुसार वाशिम जिल्हा पोलीस दलातुन पोलीस अधिक्षक, जालना जिल्हा पोलीस दलात " पोलीस शिपाई " या पदावर हजर होणेकामी या आस्थपनेवरुन दिनांक २९/०५/२०२० रोजीचे मा. नंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारीचे नांव पदनाम/ब.नं. | आंजिब. बदलीवर स्वीकारण्याचे प्रवर्ग | सद्याची नेमणुक | कोठुन | कोठे |
|---|---|---|---|---|---|
| १. | मपोशि/१४७८, सुनिता मधुकर खरात | खुला | पो.मु.वाशिम | वाशिम जिल्हा | जालना जिल्हा |

नमुद पोलीस कर्मचारी यांची आंतर जिल्हा बदली विनंतीनुसार असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी व स्थानांतर भत्ता ) अनुज्ञेय राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**पदोन्नती :- निरंक**

**नेमणुक :- निरंक**

**भाग-२ :-**
**रजा :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक:- पोअवा/पशा-१/रापोनि-क्षिरसागर/सिक कालावधी/२३३७/२०२० वाशिम दिनांक :- १३/०५/२०२० अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी मध्ये सिक मध्ये होते. त्यांचा सिक कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पो.अधिकारी नाव, नेमणुक ठिकाण | सिक कालावधी | रजा मंजुर |
|---|---|---|---|
| १. | रापोनि. संजय महादेवराव क्षिरसागर, पोलीस मुख्यालय, वाशिम. | दि. ०३/०४/२०२० ते ०९/०४/२०२० | ०६ दिवस परावर्तीत रजा |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक :-पोअवा/पशा-१/सपोनि.-वाढवे/सिक कालावधी/२५७०/२०२० वाशिम दिनांक :- २२/०५/२०२० अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी मध्ये सिक मध्ये होते. त्यांचा सिक कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पो.अधिकारी नाव, नेमणुक ठिकाण | सिक कालावधी | रजा मंजुर |
|---|---|---|---|
| १. | सपोनि. अजयकुमार विठ्ठलराव वाढवे, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम. | १६/०३/२०२० ते ०५/०५/२०२० | ५१ दिवस परावर्तीत रजा |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि.-३/गर्भपात रजा/मपोशि-सोनली/९८०/२६०३/२०२०, वाशिम. दिनांक :- २६/०५/२०२० अन्वये मपोशि/९८०, सोनाली रामदास सोळंके नेमणुक जिल्हा विशेष शाखा., वाशिम यांना त्यांचे विनंतीनुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक :- अरजा/१४९०/१२/सेवा/-९ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८/०७/१९९५ अन्वये वैद्यकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्रानुसार ४५ दिवस गर्भपात रजा मंजुर करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक :- पोअवा/आलि.-०२/अर्जित रजा/पो.कर्मचारी/२५९९/२०२०, वाशिम. दिनांक :- २६/०५/२०२० अन्वये सपोउपनि/४७०, विजय रा. नरवाडे नेमणुक पो.स्टे. वाशिम ग्रामीण यांनी मुलीचे लग्नाकरीता अर्जित रजा मिळणे बाबतची विनंती केल्याने त्यांना यापुर्वी मंजुर असलेल्या १५ अर्जीत रजेला जोडुन वाढीव १५ दिवस अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे. ठाणेदार यांनी त्यांचे आवश्यकतेनुसार व महत्वाचे बंदोबस्त तसेच कायदा व सुव्यवथेची परिस्थीती पाहुनच कर्मचाऱ्यांना रजेवर सोडावे. तसेच एका वेळी १० टक्के पेक्षा जास्त पोलीस कर्मचारी यांना रजेवर सोडण्यात येवू नये. वर नमुद पोलीस कर्मचारी हे रजेवर गेल्याचे व परत आल्याचे दिनांक व वेळ आपले स्टे.डा.साना क्रमांकासह अहवाल उलट-टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि.-३/सिक-रजा/मयत-सपोउपनि-९५४/अहमद अली/२६०९/२०२०, वाशिम दिनांक २७/०५/२०२० अन्वये मयत सपोउपनि/९५४, अहमद अली तालेब अली तत्कालीन नेमणुक पो.मु. वाशिम यांचे दिनांक २९/०९/२०१९ ते ०३/०५/२०२० पावेतो २२२ दिवस सिक कालावधीची खालील प्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

१) दिनांक २५/०९/२०१९ ते दिनांक २९/०३/२०२० पावेतो १८७ दिवस **" परावर्तीत रजा "**
२) दिनांक ३०/०३/२०२० ते दिनांक ०३/०५/२०२० पावेतो ३५ दिवस **" अर्जीत रजा "**

एकुण :- २२२ दिवस.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक: पोअवा/पशा-१ पोउपनि.सरोदे/सिक कालावधी /२६१८/२०२० वाशिम दिनांक :- २७/०५/२०२० अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी यांचे नावसमोर दर्शविलेल्या कालावधी मध्ये सिक मध्ये होते. त्यांचा सिक कालावधी त्यांचे नावसमोर दर्शविल्याप्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी नाव, नेमणुक ठिकाण | सिक कालावधी | रजा मंजुर |
|---|---|---|---|
| १. | पोउपनि. रामबाबु ग्यानबा सरोदे<br>पो.स्टे. अनसिंग | २५/०४/२०२० ते<br>२५/०५/२०२० | ३० दिवस अर्जित रजा |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक :- पोअवा/आलि-२/पोहवा-६८९/सिक -हजर/२६२१/२०२०, वाशिम दिनांक :- २७/०७/२०२० अन्वये पोहवा/६८९, माणिक काशिरात कालापाड नेमणुक पो.स्टे. मालेगांव यांचे दिनांक १५/०४/२०२० ते दिनांक २७/०५/२०२० पावेतो ४३ दिवस सिक कालावधीची परावर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि.-३/बा.सं.रजा/मपोशि-१२७६/सुप्रीया/२६७०/२०२०, वाशिम, दिनांक :-२९/०५/२०२० अन्वये मपोशि/१२७६, सुप्रीया डोंगरे नेमणुक पो.स्टे. मानोरा यांना बालसंगोपन रजेवर कार्यमुक्त करणेबाबत मपोशि/१२७६, सुप्रीय डोंगरे नेमणुक पो.स्टे.मानोरा यांना बालसंगोपन रजेवर कार्यमुक्त करणेबाबत मपोशि/१२७६, सुप्रीया डोंगरे नेमणुक पो.स्टे. मानोरा यांची ०२ महिन्याची बालसंगोपन रजा मंजुर करण्यात आलेली आहे. परंतु अद्याप पावेतो त्यांना सदरचे बालसंगोपन रजेवर रवाना करण्यात आलेले नाही. नमुद महिला पोलीस कर्मचारी हयांना त्यांचे मंजुर असलेल्या बालसंगोपन रजेवर रवाना करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक: पोअवा/आलि. -३/प्रसुती रजा/मपोशि-९८५/मोहीनी/२६७१/२०२०, वाशिम. दिनांक :- २९/०५/२०२० अन्वये खालील नमुद महिला पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंती नुसार महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम, १९८१ मधील ७४ च्या तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: अरजा-१४०९/प्र.क्र.०८/०९/सेवा-६, दि.२४ ऑगस्ट, २००९ व महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्ररजा-२०१५/प्र.क्र.२५/ सेवा-६ दि. १५/०१/२०१६ अन्वये १८० दिवसाची प्रसुती रजा (विशेष रजा) रजेवर सोडलेल्या दिनांका पासुन मंजुर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पदनाम व ब.नं | पोलीस कर्मचाऱ्यांचे नाव | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | मपोशि/९८५ | मोहीनी बाळु वर्धे | पो.स्टे., वाशिम शहर |

**परवानगी :-**

या कर्यालयाचे आदेश क्रमांक:-पोअवा/आस्था/प्लॉट-परवानगी/पो.कर्म./२६३८/२०२०,वाशिम.दिनांक:- २७/०३/२०२० अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंतीनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधिल पोटनियम क्रमांक १९(२) ते ५ व स्पष्टीकरण क्रमांक ५(२) मधिल अटीच्या अधिन राहुन त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे प्लॉट खरेदीची परवानगी देण्यात येत आहे. तसेच नमुद कर्मचारी यांना कळविण्यात येते की, त्यांनी कोणत्याही संस्थेकडुन घेतलेल्या कर्जाची /बँक कर्जाची परतफेडीची हे कार्यालयास कुठल्याही प्रकारची हमी घेणार नाही, याची नोंद घ्यावी. या अटीवर सदरची परवानगी देयण्यात येत आहे. १) पोना/४९, विनोद दामोदर सुर्वे. २) पोशि/१५३, धनंजय अरखराव. ३) पोहवा/१७६, प्रकाश नवसाजी जुमडे. ४) मपोशि/२४४, अनिता प्रल्हाद कांबळे. ५) पोना/३८५, संदिप मोहनराव गायकवाड. ६) पोना/६७०, वासुदेव प्रल्हाद चव्हाण ७) पोशि/९८४, मोहम्मद मुबशीर मोहम्मद मलीक. ८) पोना/९६६, संतोष भिकासिंग राठोड. ९) मपोशि/१३२०, कल्पना लक्ष्मणराव टनकेकर. १०) पोशि/१३४१, देवानंद सुरेश कुरटवाड. ११) पोना/१३७२, संतोष नारायण इंगोले. १२) पोशि/१३९३, मनिषा विनायक आढे.

भाग -३ :-

बढती :- निरंक

पगार:-

या कार्यालयाचे आदेश क्रमांक :पोअवा/पशा-१/पोउपनि-सरोदे/रुग्णनिवेद/२५७१/२०२० वाशिम दिनांक :- २२/०५/२०२० अन्वये पोउपनि रामबाबु सरोदे नेमणुक पो.स्टे. अनसिंग हे दिनांक २६/०४/२०२० रोजी स्टेशन डायरी साना क्र.१३/२० प्रमाणे ११/३८ वा. पासुन सिक मध्ये गेलेले आहेत. तसेच ठाणेदार यांनी त्यांना वारंवारं फोन केला असता त्यांचा फोन बंद आहे. तरी पोउपनि रामबाबु सरोदे नेमणुक पोस्टे. अनसिंग हे दिनांक २६/०४/२०२० पासुन सिक मध्ये गेले असुन तसेच त्यांनी सिकबाबत कोणतेही कागदपत्र कार्यालयास सादर केले नसल्याने सदर अधिकारी कर्तव्यावर हजर होईपर्यंत त्यांचा पगार बंद करण्यात यावा.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक: पोअवा/आलि-२/पोशि-५८/नासणे/वेतन-बंद/२६००/२०२०, वाशिम, दिनांक :- २६/०५/२०२० अन्वये वेतन बंद करणे बाबत पोशि/५८, एकनाथ नासणे नेमणुक पो.मु. वाशिम हे दिनांक ०९/०३/२०२० पासुन अनधिकृतपणे गैरहजर असल्याने नमुद पोलीस कर्मचारी यांचे वेतन बंद करण्यात यावे. नमुद पोलीस कर्मचारी हे ज्यावेळी कर्तव्यावर हजर होतील त्यांचे सिक रजेचे कालावधी बाबतचे जसे आदेश होतील त्याप्रमाणे त्यांचे सदर कालावधीबाबतचे वेतनाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक: पोअवा/आलि-३/वेतनबंद/पो.कर्म/२६०४/२०२०, वाशिम दिनांक :- २६/०५/२०२० अन्वये वेतन बंद करणे बाबत खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कर्तव्यावर सतत सिक/गैरहजर आहेत. नमुद पोलीस कर्मचारी हे कर्तव्यावर हजर होईपर्यंत त्यांचे वेतन बंद करण्यात यावे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचाऱ्याचे नांव | नेमणुक | सिक/गैरहजर असल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | पोना/६८६, सतिष कुटे | पो.मु. वाशिम | दिनांक ०४/०४/२०२० पासुन गैरहजर |
| २. | पोना/६६२, कैलास मंगु राठोड | पो.मु. वाशिम | दिनांक १०/०४/२०२० पासुन गैरहजर |
| ३. | पोशि/६८५, श्रीराम कांबळे | पो.मु. वाशिम | दिनांक ३०/०३/२०२० पासुन सिक मध्ये |

तसेच वर नमुद पोलीस कर्मचारी हे ज्यावेळी कर्तव्यावर हजर होतील त्यांचे सिक /गैरहजर कालावधीबाबत जसे आदेश होतील त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

भाग -४ :-

बक्षिस:-

या कार्यालयाचे ओदश क्रमांक :- पोअवा/आशा-४/बक्षिसअहवाल/पो.स्टे. मंगरुळपीर /मंजुर/ २६४०/२०२०, वाशिम दि. २७/०५/२०२० अन्वये मुंबई पोलीस नियमावली १९९९ नियम ३०१ (१)(ड) अन्वये मा. पोलीस अधिक्षक साहेब यांच्या आदेशा प्रमाणे स्टाफसह खाजगी वाहन व खाजगी व्यक्तीसह ओळख लपवुन कोरोणा प्रार्दुभाव संबंधाने दि. १९/०१/२०२० रोजी. ०१.०५ वा. ग्राम कवठळ येथे असलेल्या फिक्स पॉईंट डयुटीवरील कर्मचाऱ्यांना चेक केले असता खालील नमुद पोलीस कर्मचारी हे कर्तव्यावर अत्यंत सतर्क असल्याचे आढळुन आले. तसेच वाचक शाखा स्टाफ यांना ग्राम कवठळ येथुन कारंजा येथे जाणे असल्याचे सांगितले असता, त्यांनी आम्हास कवठळ गांव हे कोरोणा पेशन्ट मुळे क्वॉरंटाईन केले असल्याने येथुन तुम्हाला जाता येणार नासलयाचे कळविले. तसेच वाचक शखा स्टाफ यांनी पैश्याचे आमीष दुवन सुध्दा त्यांनी आम्हाला कारंजा येथे कवठळ गावातुन जावु दिले नाही व त्यांनी त्यांचे कर्तव्य चांगल्या प्रकारे बजावले आहे. ही उत्कृष्ट कामगीरी केली आहे. म्हणुन त्यांना प्रोत्साहनपर बक्षिस मंजुर करण्यात येत आहे.

खालील नमुद पोलीस कर्मचारी व होमगार्ड कर्मचारी यांची ही कामगीरी निश्चितच प्रशंसनिय आहे. भविष्यात देखिल त्यांनी अशाच प्रकारे मेहनत घेवुन कर्तव्य पार पाडावे यासाठी त्यांचा उत्साह व्दिगुनीत व्हावा त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणुन त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी नाव ब.नं. | नेमणुक | मंजुर बक्षीस |
|---|---|---|---|
| १. | पोहेकॉ/६०६, गुणवंत गायकवाड | पो.स्टे. मंगरुळपीर, जि. वाशिम | रु. ५००/- व जिएसटी |
| २. | पोकॉ/१६४, सचिन राऊत | पो.स्टे. कारंजा शहर, जि. वाशिम | रु. ५००/- व जिएसटी |
| ३. | होमगार्ड/२०२, संतोष चौधरी | पो.स्टे. मंगरुळपीर, जि. वाशिम | रु. ५००/- व जिएसटी |

२/- उपरोक्त पोलीस कर्मचारी व होमगार्ड कर्मचारी यांना एकुण बक्षिस रुपये १५००/- (अक्षरी रुपये एक हजार पाचशे फक्त ) प्रथमच मंजुर करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक :- पोअवा/आशा-४/बक्षिसअहवाल//मंजुर/श्वान पथक, वाशिम/ २६६७/२०२०, वाशिम दिनांक :- २९/०५/२०२० अन्वये मुंबई पोलीस नियमावली १९९९ नियम ३०१ (१)(ड) अन्वये मा. अपर पोलीस अधिक्षक, श्वा.प्र.के., गु.अ.वि., म.रा.पुणे यांचे पत्र क्र. अपोअ/श्वाप्रके/गुअवि/बक्षीस नोंद/५६/२०२० पुणे. दि. २४/०१/२०२० अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना १७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा २०१९ हा दि. २५/११/२०१९ ते दि. ३०/११/२०१९ या कालावधी दरम्यान एस.आर.पी.एफ ग्रुप १ व २ हडपसर पुणे येथे आयोजीत करण्यात आला होता. त्यामध्ये आयोजीत केलेल्या डॉग शो करीता खालील नमुद कर्मचारी यांनी आपआपले श्वानांसोबत सराव करुन नेमुन दिलेले इव्हेंटप्रमाणे दिनांक ३०/११/२०१९ रोजी १७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा २०१९ च्या सांगता समारोपाच्यावेळी मा. अपर पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई. यांच्या समक्ष उत्कृष्ट रित्या कामकाज केल्याबद्दल खालील प्रमाणे बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांची ही कामगीरी निश्चितच प्रशंसनिय आहे. भविष्यात देखिल त्यांनी अशाच प्रकारे मेहनत घेवुन कर्तव्य पार पाडावे यासाठी त्यांचा उत्साह व्दिगुनीत व्हावा त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणुन त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी यांचे नांव, पदनाम व ब.नं. | नेमणुक | मंजुर बक्षीस |
|---|---|---|---|
| १. | पोहवा/१०८, श्री.एस.एस.शेजुळकर ( श्वान हस्तक ) | श्वान पथक , वाशिम | रु. ७५०/- व जिएसटी |

२/- उपरोक्त पोलीस कर्मचारी यांना एकुण बक्षिस रुपये ७५०/- (अक्षरी रुपये सातशे पन्नास फक्त) प्रथमच मंजुर करण्यात येत आहे.

**भाग -५ :-**

**शिक्षा :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौ/पी-६७(१)/पोनि धुव्रास बावनकर/अंतीम आदेश/२६४४/२०२०, २८/०५/२०२० अन्वये पोनि धुव्रास बावनकर, नेम. पो.स्टे. मानोरा सध्या नेम. पो. नियंत्रक कक्ष, वाशिम यांना २ वर्ष वार्षिक वेतनवाढ रोखणेबाबत शिक्षेचे आदेशाची प्रत तामीळ कारणेबाबत प्रत्येकी दोन प्रती या प्रती या पत्रासोबत जोडल्या आहेत. त्यापैकी एक प्रत पोनि धुव्रास बावनकर, नेम. पो.स्टे. मानोरा सध्या नेम. पो. नियंत्रण कक्ष, वाशिम यांना तामिळ करुन दुय्यम प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवुन स्वाक्षरीत प्रत या कार्यालयास उलट-टपाली सादर करावी.

**निलंबन :- निरंक**

**भाग -६ :-**

**प्रशिक्षण व इतर :-**

**प्रशिक्षण:- निरंक**

**इतर. :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक:पोअवा/पशा-१/पो.उप.अधीक्षक. आर्थिक गुन्हे शाखा/कार्यभार/२०२०/२६७८/ वाशिम दिनांक :- २९/०५/२०२० अन्वये श्रीमती मृदुला महेश लाड पोलीस उपअधिक्षक आर्थिक गुन्हे शाखा वाशिम हे दिनांक २०/०४/२०२० पासुन कोरोना पॉझीटिव्ह झाल्याने सिकमध्ये गेले आहेत. तरी श्रीमती मृदुला महेश लाड पोलीस उपअधिक्षक आर्थिक गुन्हे शाखा वाशिम हयांचेकडील आर्थिक गुन्हे शाखा वाशिम या पदाचा तात्पुरता अतिरिक्त कार्यभार श्री. यशवंत रघुनाथ केडगे, पोलीस उपअधिक्षक मंगरुळपीर उपविभाग यांचेकडे पुढील आदेशापावेतो सोपविण्यात येत आहे.

( वसंत परदेशी )
भा.पो.से.
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी करणेबाबत /पत्रव्यहार शाखा लिपीक-१/डिपीजी लिपीक पो.अ.कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक २२ हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्याात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

-----ooooo-----